निर्भीड, निष्पक्ष साप्ताहिक

तांदुळनगरी

RNI NO. MHMar/25/A2200

दिनांक: 08 जुलै 2026 शनिवार

तांदूळनगरी प्रतिनिधी | नागपूर

सेंट जॉन्स पब्लिक स्कूलमध्ये सायबर सुरक्षेवषी जनजागृती अभियान उत्साहात

७५० हून अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; ऑनलाईन फसवणूक, OTP, QR कोड व फिशिंगपासून बचावाचे धडे

नागपूर | प्रतिनिधी तांदूळनगरी : क्विक हील फाउंडेशनच्या 'Cyber Shiksha for Cyber Suraksha' या उपक्रमांतर्गत तसेच शासकीय न्यायवैद्यक विज्ञान संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सेंट जॉन्स पब्लिक स्कूल, नागपूर येथे दि. 30 जुलै 2026 रोजी सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.



कार्यक्रमात शासकीय न्यायवैद्यक विज्ञान संस्थेचे विद्यार्थी कुणाल मेश्राम आणि ऋतुजा गिरी यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी बनावट लिंक, OTP फसवणूक, QR कोड स्कॅम, फिशिंग, KYC अपडेटच्या नावाखाली होणारी फसवणूक यांसह विविध प्रकारच्या सायबर गुन्ह्यांबाबत विद्यार्थ्यांना उदाहरणांसह माहिती देण्यात आली.

अनोळखी व्यक्तींना वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती न देणे, संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे आणि डिजिटल व्यवहार करताना सतर्क राहणे याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

या जनजागृती अभियानाचा लाभ ७५० हून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला. शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सायबर सुरक्षेशी संबंधित महत्त्वपूर्ण माहिती जाणून घेतली.

विद्यार्थ्यांना देण्यात आले महत्त्वाचे धडे

- वाढत्या सायबर गुन्ह्यांची कारणे
- ऑनलाईन फसवणूकीचे प्रकार
- डिजिटल व्यवहारातील खबरदारी
- सोशल मीडियाचा सुरक्षित वापर
- सायबर गुन्ह्यांपासून बचावांचे उपाय
- बनावट लिंक, OTP फसवणूक, QR कोड स्कॅम
- फिशिंग, KYC अपडेट फसवणूकीची माहिती

> “आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी अशा जनजागृती कार्यक्रमांची नितांत गरज आहे.
>
> – शाळा व्यवस्थापन, सेंट जॉन्स पब्लिक स्कूल, नागपूर

अशाच ब्रेकिंग बातम्या व ताज्या घडामोडी जाणून घेण्यासाठी आपल्या व्हॉट्सॲपमध्ये 7218031819 ॲड करा.